POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

◎संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

◎उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ◎कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२५० ● मुंबई, शनिवार, १२ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

महिन्याच्या ७ तारखेला एसटी कर्मचाऱ्यांचा पगार, महामंडळाला १२० कोटी तातडीने

## मंत्री सरनाईकांच्या बैठकीत ३ महत्त्वाचे निर्णय

**एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी लागणारा निधी हा एक महिना आधीच महामंडळाला मिळणार**

पुढील महिन्यापासून एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी लागणारा निधी हा एक महिना आधीच एसटी महामंडळाला राज्य सरकार हस्तांतरित करणार असल्याची माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. ज्या १०७६ कोटींची मागणी एसटी महामंडळाने केली होती, त्यापैकी १२० कोटी आता देण्यात येणार आहेत. तर उर्वरित रक्कम तीन टप्प्यात एसटी महामंडळाला राज्य सरकारकडून मिळणार असल्याचे सरनाईक म्हणाले. तसेच प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला एसटी कर्मचाऱ्यांचा पगार दिला जाणार असल्याची माहिती सरनाईक यांनी दिली. हे तीन महत्त्वाचे निर्णय आता झालेल्या बैठकीत घेण्यात आल्याचे प्रताप सरनाईक यांनी एबीपी माझाला सांगितले. दरम्यान, सरनाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे आभार मानले आहेत. नुकतेच राज्य सरकारने एस टी कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या संदर्भात केवळ ५६ टक्के पगार देणार असल्याचे जाहीर केले होते. यानंतर एस टी कर्मचाऱ्यांनी याला कडाडून विरोध दर्शविला आहे. नेहमीच एसटी कर्मचाऱ्यांचा पगार रखडला जातो. मात्र, एसटीच्या इतिहासात पहिल्यांदाच एसटी कर्मचाऱ्यांचा पगार या महिन्यात फक्त ५६% झालेला आहे. निधी नसल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांचा पगार इतका कमी झालेला आहे. एसटी कामगार संघटनांनी मात्र यावर संताप व्यक्त केला आहे. आधीच अपुरा पगार आणि त्यात जर फक्त ५६% पगार मिळणार असेल तर एसटी कर्मचाऱ्यांनी जगायचं कसं असा प्रश्न महाराष्ट्र एसटी कर्मचारी सरकारकडे उपस्थित करत आहेत. तसेच सरकारने या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली जात आहे. जर सरकारने हा निर्णय बदलला नाही तर आम्ही कोणत्याही क्षणी आंदोलनाची भूमिका घेऊ असा इशारा एसटी कर्मचारी संघटनेनं घेतला होता.




**■मुंबई। प्रतिनिधी :**
एसटी कर्मचाऱ्यांसाठी मोठी आणि दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. आता प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला रळ कर्मचाऱ्यांचा पगार होणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. तसेच ४४ टक्के उर्वरित पगाराची रक्कम देण्यासाठी ताबडतोब १२० कोटी रुपये राज्य सरकार एसटी महामंडळाला हस्तांतरित करणार असल्याचे प्रताप सरनाईक म्हणाले. सरनाईक यांनी आज वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय यांची भेट घेतली. या बैठकीत महत्त्वाच्या विषयांवर झाली चर्चा झाली असून, ३ मोठे निर्णय घेण्यात आले आहेत.

## उष्माघाताचा पहिला बळी विदर्भात

**१२ वर्षीय शाळकरी मुलाचा मृत्यू, प्रशासन अलर्ट मोडवर**



**■बुलढाणा। प्रतिनिधी :**
महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा पारा चांगलाच वाढला असून नागरिकांना गरम झळा सोसाव्या लागत आहेत. त्यात विदर्भात तापमानाने सर्वाधिक उच्चांकी गाठली असून एका शाळकरी मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत गजानन महाराज ज्ञानपीठमध्ये इयत्ता ६ वीत शिकणाऱ्या संस्कार सोनटक्के या १२ वर्षीय विद्यार्थ्यार्ला कडक उन्हामुळे त्रास झाला. त्यानंतर, पालकांनी त्याला अकोला येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान संस्कारचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेनं जिल्हा प्रशासनही खडबडून जागं झालं आहे. राज्यातील बहुतांश जिल्ह्यात तापमान वाढले असून विदर्भ आणि मराठवाड्यात चटके देणारं ऊन पडलंय. सोलापूर जिल्ह्याने ४२ अंश सेल्सियसचा आकडा गाठला असता विदर्भातही तापमानाने चाळीसी केव्हाच पार केली आहे. वाढत्या तापमानामुळे दिवसेंदिवस बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांना फटका बसत असून कडक उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच, येथील शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. जिल्ह्यात संस्कार सोनटक्के या विद्यार्थ्यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची माहिती अकोला जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून बुलढाणा जिल्हा शल्य चिकित्सक यांना कळविण्यात आली आहे. त्यामुळे, आरोग्य विभाग व जिल्हा प्रशासनाकडून नागरिकाना काही महत्त्वाच्या सूचना खबरदारीचा उपाय म्हणून केल्या जात आहेत.




## 'रायगडावरचा वाघ्या कुत्रा फेकून द्या'

**उदयनराजे भोसले संतापले... म्हणाले 'ही ब्रिटिशांची कुत्री'**

**■मुंबई। प्रतिनिधी :**
रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या समाधीवरुन वाद पेटलेला असताना भाजपा खासदार उदयनराजे भोसले यांनी संताप व्यक्त केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज असणाऱ्या उदयनराजे भोसले यांनी वाघ्या कुत्र्याचा पुतळा फेकून द्या असं स्पष्ट मत मांडलं आहे. एवढ्या लांब कानाचा कुत्रा भारतीय असू शकतो का? अशी विचारणाही त्यांनी केली आहे. तसंच ही ब्रिटिशांची कुत्री असल्याचं विधान केलं आहे. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त फुलेवाड्यात आले असता ते प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते.

उदयनराजे भोसले यांना रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या समाधीबद्दल विचारण्यात आलं असता ते म्हणाले की, ''कसला वाघ्या, ते कुत्रं बघा. भारतात कधी तुम्ही इतक्या लांब कानाचं कुत्रं कधी पाहिलं आहे का? ही सगळी ब्रिटिशांची कुत्री होती ना, ती आली. ही कुत्री ब्रिटीश असेल. दणका देऊन, फेकून द्यायचं. त्यात एवढा काय विचार करायचा''.

दरम्यान यावेळी त्यांनी राजभवनात शिवस्मारक उभारायला हवं असं मतही मांडलं. राज्यपालांना राहण्यासाठी इतकी मोठी जागा कशाला लागते? अशी विचारणा त्यांनी केली. ते म्हणाले की, ''राज्यपाल भवनाची जागा जवळपास ४८ एकर आहे. त्या जागेत शिवस्मारक व्हावं. एखाद्या राज्यपालाला राहण्यास किती जागा लागते? ४८ एकर म्हणजे थोडी जागा नाही. आणि अरबी समुद्राला लागूनच आहे. त्या ठिकाणी शिवस्मारक व्हावं यासंदर्भात मी अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोललो आहे. त्याची त्यांनी घोषणा करावी''.



**'महिलांची पहिली शाळा थोरले प्रतापसिंह महाराज यांनी सुरु केली'**

''एका दृष्टीकोनातून आपण पाहिलं तर थोरले प्रतापसिंह महाराज जे होते, त्यांचं महात्मा फुलेंनी अनुकरण केलं. सर्वप्रथम स्त्री शिक्षणाची शाळा जर कुणी सुरु केलं असेल तर ती थोरले प्रतापसिंह महाराज यांनी सुरु केली. तीदेखील स्वतःच्या राजवाड्यात सुरु केली. त्या राजवाड्यात कालांतराने ज्यांनी देशाचं संविधान लिहिलं ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचं प्राथमिक शिक्षण त्याच राजवाड्यात झालं", असं उदयनराजे भोसले म्हणाले आहेत. उदयनराजे यांच्या यांच्या या वक्तव्याचा समाचार ओबीसी नेते मंगेश ससाने यांनी घेतला आहे. ''जे सातारचे महाराज आहेत त्यांना महात्मा फुले यांनी 1 जानेवारी १९४८ साली भिडेवाडा येथे मुलींची पहिली शाळा सुरु केली यावरही आक्षेप आहे. एक नवा शोध उदयनराजे यांच्या माध्यमातून लागत आहे. यासाठी सगळे इतिहासतज्ज्ञ, संशोधक त्यांच्यासमोर फेल ठरले आहेत. उदयनराजे यांनी जो गौप्यस्फोट केला आहे हा महाराष्ट्राचा सामाजिक, शैक्षणिक क्रांतीचा इतिहास आहे त्याला धक्का देणारा आहे," असं ते उपहासात्मकपणे म्हणाले आहेत.

मोठा निर्णय आता शाळेतून शिवी हद्दपार

## विद्यार्थ्याने शिवी दिली तर...

**■बदलापूर। प्रतिनिधी :**
बदलापूरकरांनी मोठा निर्णय घेतला आहे. नव्या निर्णयानुसार आता बदलापूरच्या सर्व शाळांमधून शिवी हद्दपार होणार आहे. विद्यार्थ्यांना चांगलं वळण लागवं, वाद टळावेत यासाठी बदलापूरमधील सर्व शाळांमधून शिवी हद्दपार करण्याचा कौतुकास्पद उपक्रम राबवण्यात येणार आहे. विद्यार्थ्याने शिवी दिल्यास त्याचा दंड पालकाना भरावा लागणार आहे.

हल्ली शाळेत विद्यार्थ्यांच्या तोंडून सर्रासपणे शिव्या ऐकायला मिळतात. पण त्यांच्या तोंडातली ही शिवराळ भाषा काढून टाकण्यासाठी बदलापुरात 'शिवी मुक्त शाळा' हे अनोखं अभियान राबविण्यात येतं आहे. आमदार किसन कथोरे यांच्या संकल्पनेतून आगामी शैक्षणिक वर्षात सर्व शाळांमध्ये ही मोहीम राबवली जाणार आहे.

बदलापूरच्या आदर्श शाळेत मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या कार्यशाळेतून या अभियानाला सुरुवात झाली. अलीकडच्या काळात टीव्ही आणि मोबाईलचा वाढता प्रभाव, मुलांकडे पालकांचं होत असलेलं दुर्लक्ष, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिव्या देण्याचं प्रमाण वाढलं आहे. मुलं असभ्य वर्तन करू लागली आहेत. हे चित्र बदलण्यासाठी बदलापुरातल्या सर्व शाळांमध्ये शिवीमुक्त शाळा अभियान राबवलं जाणार आहे. यासाठी या सर्व शाळांमध्ये कडक नियमावली केली जाणार असून, मुलांच्या वर्तनावर शिक्षकांची नजर असणार आहे. मुलांनी शिवीगाळ केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल आणि हा दंड पालकांना भरावा लागेल. या अभियानामुळे मुलांवर निश्चितच चांगले संस्कार होतील, त्यांच्या भाषेचा दर्जा सुधारेल, एक सुजाण पिढी तयार करण्यासाठी हे अभियान पथदर्शी ठरेल, असा विश्वास आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केला आहे.




**...तर पालकांना दंड**

मुलांवर चांगले संस्कार घडावेत, शिवीगाळमध्ये अनेकदा वाद होतात हे वाद टळावेत यासाठी बदलापुरात हा उपक्रम राबवण्यात आला आहे, आमदार किसन कथोरे यांच्या संकल्पनेतून आगामी शैक्षणिक वर्षात सर्व शाळांमध्ये ही मोहीम राबवली जाणार आहे. मात्र तरी देखील जर विद्यार्थ्यानं शिवी दिली तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, त्याचा दंड पालकांना भरावा लागणार आहे, असं निर्णय घेण्यात आला आहे.

## लातूरच्या डोंगरात ड्रग्जची फॅक्टरी

**मुंबईच्या ड्रग्जप्रकरणी डीआरआयचा लातूरमध्ये छापा**



**लातूरच्या डोंगरात ड्रग्जची फॅक्टरी :**

- चाकूर तालुक्यातील रोहिणा गावात ड्रग्जची फॅक्टरी
- प्रमोद केंद्रे या मुंबई पोलिसांतील कर्मचाऱ्याचा सहभाग उघड झालाय
- शेतात उभारलेल्या एका पत्र्याच्या शेडमध्ये ड्रग्ज बनवलं जायचं
- गुप्त प्रयोगशाळा उभारून मेफेड्रोन ड्रग्ज तयार केलं जात होतं
- गुप्त माहितीच्या आधारे डीआरआयच्या मुंबई युनिटने छापा टाकला
- 17 कोटींच्या किमतीचं ११.३६ किलो मेफेड्रोन जप्त

**■लातूर। प्रतिनिधी :**
शिक्षणाच्या लातूर पॅटर्नसाठी ओळखला जाणारा लातूर जिल्हा सध्या ड्रग्ज प्रकरणांमुळे चर्चेत आलाय. ह्यलातूर पॅटर्नह्मुळे देशभरात नावाजलेल्या या शहराचं नाव आता थेट मायानगरी मुंबईतील ड्रग्ज प्रकरणाशी जोडलं जातंय. लातूरच्या डोंगरात ड्रग्ज फॅक्टरी चालवली जात होती. या फॅक्टरीवर कारवाई करत पाच जणांना अटक करण्यात आली आहे. मुंबई पोलिस कर्मचाऱ्यानेच ही फॅक्टरी थाटल्याची माहिती समोर आलीय.

लातूरच्या चाकूर तालुक्यातील डोंगरात ड्रग्जची फॅक्टरी चालवली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुंबईतल्या ड्रग्ज प्रकरणाचा तपास करणाऱ्या डीआरआयच्या पथकाने लातूरमधील रोहिणा परिसरात छापा टाकला होता. या छाप्यात ५ आरोपींना अटक केली होती. तर २ आरोपींना मुंबईतून ताब्यात घेतलंय. या प्रकरणात मुंबई पोलिस दलात कार्यरत असलेल्या प्रमोद केंद्रेचा सहभाग असल्याचं उघड झाला आहे. अधिक धक्कादायक बाब म्हणजे हा सर्व प्रकार चाकूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडत होता. आणि तरीही स्थानिक पोलिसांना याची कानोकानी खबर नव्हती. राज्याच्या ग्रामीण भागातही ड्रग्जचा विळखा पडताना दिसतोय. शिक्षणाच्या पॅटर्नसाठी प्रसिद्ध असेलेल्या लातूरमध्ये थेट ड्रग्जची फॅक्टरी सुरू होती. या सगळ्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्हउपस्थित केलं जातं आहे.

## राज्यात सोलापुरात माणुसकीला काळीमा!

**सात महिन्याच्या गर्भवती महिलेला लाथाबुक्क्यांनी मारहाण**

**■सोलापुर। प्रतिनिधी :**
महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटनामंध्ये वाढ होत आहे. मारहाण, खून, दरोडा, हत्या, तोडफोड, चोरी यांसारख्या गुन्ह्यांची पोलिसात नोद होताना दिसत आहे. त्यातच आता सोलापूर शहरात एक अत्यंत धक्कादायक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. सोलापुरातील तुळजाई नगर भागात एका सात महिन्यांच्या गर्भवती महिलेला निर्दयीपणे मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. या महिलेला तीन ते चार महिलांनी मारहाण केल्याचे बोललं जात आहे. यामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

या घटनेबाबत शिल्पा यांची सासू प्रभावती मिस्कीन यांनी सांगितले की, ''माझा मुलगा एका कारखान्यात कामाला आहे. त्याच्या कामाच्या ठिकाणी असलेली एक मुलगी सतत त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करत होती. काही दिवसांपूर्वी त्या दोघ एकमेकांशी बोलत असताना मुलीच्या कुटुंबियांनी पाहिले. त्यांच्या कुटुंबियांना याच गोष्टीचा राग आला. त्या मुलीच्या नातेवाईकांनी माज्या घरी येऊन माझा मुलगा आणि सूनेला शिवीगाळ केली. त्यानंतर तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. गर्भवती असूनही तिच्या पोटावर आणि पाठीवर गंभीर इजा होईल अशा पद्धतीने मारहाण करण्यात आली. असे प्रभावती मिस्कीन म्हणाल्या. आमची काही चूक नसताना त्यांनी आम्हाला मारहाण केली. इतकेच नव्हे तर, आम्हाला मारहाण करून पोलीस स्टेशनमध्ये आमच्या नावाची तक्रार देण्याचा प्रयत्न केला. आमच्या घरासमोर सीसीटीव्ही कॅमेरा आहे. पोलिसांनी आणि माध्यमांनी याची पडताळणी करावी,'' असे आवाहन प्रभावती मिस्कीन यांनी केले आहे.

या घटनेमुळे सोलापूर शहरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. गर्भवती महिलेवरील या अमानुष हल्ल्याचा सर्वत्र निषेध केला जात आहे. पोलीस या प्रकरणाचा कसून तपास करत आहे. लवकरच आरोपींना अटक होईल, असे पोलिसांनी म्हटले आहे.




**नेमकं काय घडलं?**

सोलापुरात एका गर्भवती महिलेला निर्दयीपणे मारहाण करण्यात आली. शिल्पा कृष्णा मिस्किन (२४) असे मारहाण झालेल्या गर्भवती महिलेचे नाव आहे. तिला पोटावर आणि पाठीवर लाथाबुक्क्यांनी गंभीर मारहाण करण्यात आली आहे, असा आरोप तिच्या कुटुंबियांनी केला आहे.

**अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून मारहाण**

या मारहाणीत जखमी झालेल्या शिल्पा यांच्यावर सुरुवातीला सोलापूर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली होती. मात्र, आता त्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर शहरातील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर मारहाण करणाऱ्या महिलांच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा अधिक तपास सुरू केला आहे. या महिलेच्या पतीचे आणि एका मुलीचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून तिच्या घरच्यांनी ही मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## पुण्यात २ महिन्यांच्या जुळ्या मुलांची हत्या, आईनेच पाण्याच्या टाकीत...

**■पुणे। प्रतिनिधी :**
पुण्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. जन्मदात्या आईनेच जुळ्या मुलांची हत्या करण्यात आल्याचे समोर आले आहे. पुणे-सोलापूर रस्त्यावरील थेऊर परिसरातील हा प्रकार आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी एका महिलेला अटक केली असून तिच्या भावाने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महिलेने जुळ्या मुलांची नीट वाढ होत नसल्याने त्यांचा खून केल्याची घटना घडली आहे. घराच्या छतावरील पाण्याच्या टाकीत बुडवून त्यांना ठार केले आहे. जुळ्या मुलांना टाकीत बुडविल्यानंतर महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी एका महिलेला अटक केली. रहिवाशांच्या सतर्कतेमुळं हा सर्व प्रकार उघडकीस आला आहे.

आरोपी महिलेचे पती सांगलीतील एका बँकेत कामाला आहेत. सध्या ती माहेरी राहत होती. तिचा विवाह दहा वर्षांपूर्वी झाला होता. विवाहानंतर दहा वर्षे अपत्यप्राप्ती न झाल्याने या दाम्पत्याने कृत्रिम गर्भधारणेचा निर्णय घेतला. टेस्टट्यूबद्वारे तिने दोन मुलांना जन्म दिला. जुळी मुले दोन महिन्यांची होती. मात्र त्यांची वाढ नीट होत नसल्याने महिला तणावात होती.



मंगळवारी ती जुळ्या मुलांना घेऊन घराच्या छतावर गेली. त्यानंतर दोघांना पाण्याच्या टाकीत बुडविले आणि तिनेही पाण्याच्या टाकीत उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या भागातील एका रहिवाशाने या घटनेची माहिती तिच्या भावाला दिली. मुलांसह महिलेला पाण्याच्या टाकीतून बाहेर काढण्यात आले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. उपचारांपूर्वीच जुळ्या मुलांचा मृत्यू झाला होता.

## १० वर्षांच्या मुलीची बलात्कार करुन हत्या

**नंतर मृतदेह सहाव्या मजल्यावरुन खाली फेकला**

**■ठाणे। प्रतिनिधी :**
ठाण्यातील मुंब्रा येथे एका १० वर्षांच्या मुलीची हत्या करुन तिचा मृतदेह इमारतीच्या डक्ट भागात फेकून दिल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली असून परिसरातील नागरिकांनी मध्य रात्री पोलिस स्थानकात धाव घेऊन आरोपीला लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी केली आहे. पोलिसांनी आरोपीला तीन तासांच्या आत ताब्यात घेतलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बिल्डिंगच्या डक्टमध्ये उंचावरुन काहीतरी पडल्याचा आवाज आल्याने नागरिकांनी खिडकी उघडून टॉर्च लावून बघितले. तेव्हा अंदाजे दहा वर्षांची मुलगी पालथ्या अवस्थेत पडलेली दिसून आली. नागरिकांनी लगेचच पोलिसांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर मुंब्रा पोलीसांनी घटनास्थळी जावून खात्री करून अग्निशमन दलाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या साह्याने डक्टमधील मुलीस बाहेर काढून तात्काळ छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल कळवा येथे नेले. मात्र त्याआधीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पोलिसांनी सुरुवातीला मुलीच्या मृत्यूबाबत कस्मात मृत्यु दाखल करण्यात आला होता. मात्र मुलीच्या मृत्यूबाबत संशय आल्याने मुंब्रा पोलिस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी जात तेथील लहान मुलांकडे चौकशी करून तसेच इतर पुरावे गोळा करून सदर बिल्डिंगमधील सर्व घरांच्या डक्टची पहाणी करून इतर साक्षीदार यांच्याकडे चौकशी केल्यानंतर सहाव्या मजल्यावरील १९ वर्षीय आसिफ अकबर मन्सुरी याला ताब्यात घेतलं. आसिफ अकबर मन्सुरी असं



आरोपीचे नाव असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता त्याने मयत मुलीसोबत लैंगिक अत्याचार करण्याच्या उद्देशाने अपहरण केले. तसंच, बलात्कारानंतर तिच्या गळ्यावर उजव्या बाजुस धारदार शस्त्राने भोसकून जिवे ठार मारून पुरावा नष्ट करण्याचा उद्देशाने इमारतीच्या डक्टमध्ये तिला फेकुन दिले अशी कबुली दिली. तसेच वैदयकीय अधिकारी यांनी मयत मुलीचे शवावविच्छेदन करून मुलीच्या मृत्यूचे कारण दिल्याने आरोपीत आसिफ अकबर मंन्सुरी विरूध्द मुंब्रा पोलीस ठाणे गुन्हा नोंद करून, त्यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# दर घसरला, अपेक्षा उंचावल्या!

भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपोदर कमी करून तो सहा टक्यांवर आणल्याचा निर्णय म्हणजे अर्थव्यवस्थेला दिलेले एक सूक्ष्म पण ठोस इंजेक्शन आहे. हा निर्णय म्हणजे, अशी चविष्ट गोळी, जी थोडा वेळ गोड लागत असली तरी तिचा परिणाम दीर्घकाळ जाणवणार आहे. मंदावलेली बाजारपेठ, गारठलेली मागणी आणि खचलेली गुंतवणूक पाहता, बँकेनं हा धोरणात्मक पाऊल उचलणं अपरिहार्य झालं होतं. स्वस्त कर्जाचा राजमार्ग मोकळा झाला की, ग्राहकांचा खर्च वाढेल, उद्योग वाढीला गती प्राप्त होईल आणि अर्थव्यवस्था त्यामुळे सावरू लागेल ही त्यामागची अपेक्षा. जेव्हा रेपोदर कमी होतो, तेव्हा बँकांना रिझर्व्ह बँकेकडून स्वस्त दरात पैसा उधार घेता येतो. परिणामी, त्या बँका सामान्य ग्राहक, व्यावसायिक संस्था आणि उद्योगांना कमी व्याजदराने कर्ज देऊ शकतात. यामुळे अर्थव्यवस्थेत चलनवाढ होते, ग्राहक खर्च करायला प्रवृत्त होतात, मागणी वाढते आणि आर्थिक वाढीस गती मिळते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या सध्याच्या परिस्थितीकडे पाहिल्यास, विकासदरात झालेली घसरण ही एक गंभीर बाब ठरत आहे. उद्योग व सेवा क्षेत्रातील गुंतवणूक मंदावली आहे, खासगी क्षेत्रातील मागणी ठप्प झाली आहे. बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. यामुळे ग्राहकांचा खर्च करण्याची इच्छाशक्ती कमी झाली आहे. ही परिस्थिती दूर करण्यासाठी, रिझर्व्ह बँकेला आर्थिक धोरणांमध्ये सुलभता आणणे आवश्यक होते. या निर्णयाचा थेट सकारात्मक परिणाम म्हणजे गृहकर्ज, वाहन कर्ज, शिक्षण कर्ज यांचे व्याजदर कमी होणे. यामुळे ग्राहकांना कर्ज घेणे सुलभ व स्वस्त होईल. घर घेण्याच्या तयारीत असलेल्या मध्यमवर्गीय ग्राहकांसाठी ही सुवर्णसंधी ठरू शकते. वाहन उद्योगा यासारख्या सध्या संकटात असलेल्या क्षेत्राला कर्ज सुलभतेमुळे थोडी आशा निर्माण होईल. याशिवाय, उद्योग क्षेत्राला कार्यशील भांडवल स्वस्तात उपलब्ध होईल, ज्यामुळे उत्पादन वाढवणे शक्य होईल. पण याचे काही नकारात्मक परिणामही आहेत. सततची रेपोदर कपात ही रिझर्व्ह बँकेच्या 'इन्फ्लेशन टार्गेटिंग' या मूलभूत धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण करू शकते. जर ग्राहक खर्च प्रचंड वाढला आणि पुरवठा त्यापेक्षा कमी राहिला, तर महागाई वाढू शकते. बँका रेपोदर कपातीनंतर लगेचच कर्ज स्वस्त करतीलच, याची खात्री नाही. कारण त्या त्यांच्या अंतर्गत आर्थिक स्थिती आणि मार्केटच्या रेटिंगनुसार निर्णय घेतात. त्यामुळे काही वेळा अशा धोरणात्मक कपातींचा अपेक्षित परिणाम होत नाही. शिवाय, मुदत ठेवांवरील व्याजदर कमी झाल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, निवृत्तिवेतनधारक व बचत करणाऱ्या वर्गावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. जागतिक स्तरावर डोनाल्ड ट्रम्प यांनी छेडलेले आयातशुल्क युद्ध हेही या निर्णयामागील एक अप्रत्यक्ष घटक ठरतो. अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्धामुळे जागतिक बाजारात अनिश्चितता निर्माण झाली आहे. अनेक देशांनी संरक्षणात्मक धोरणे स्वीकारली आहेत, जेणेकरून त्यांच्या देशांतर्गत उत्पादकांचे संरक्षण करता येईल. यामुळे जागतिक व्यापारात मंदीचे वातावरण निर्माण झाले आहे आणि भारतालाही याचा फटका बसला आहे. विशेषतः निर्यात कमी झाल्यामुळे भारताच्या चालू खात्यातील तुटीवर प्रभाव पडला आहे. अशा वेळी देशांतर्गत मागणी वाढवण्यासाठी आणि स्थानिक उद्योगांना चालना देण्यासाठी रिझर्व्ह बँकेला रेपोदर कपात करण्यास भाग पाडले गेले. याशिवाय, अमेरिका आणि युरोपियन युनियनने त्यांच्या देशांत आर्थिक सुलभतेची धोरणे अवलंबिलेली आहेत. यूएस फेडरल रिझर्व्हनेही व्याजदरात कपात केली आहे, त्यामुळे भारताकडूनही अशाच प्रकारच्या उपाययोजनांची अपेक्षा होती, जेणेकरून परकीय गुंतवणूक टिकवून ठेवता येईल. अन्यथा, भारतातील व्याजदर अधिक राहिल्यास, परदेशी गुंतवणूकदारांना भारतीय बाजार अपील करणार नाही आणि त्यांचे भांडवली निर्गमन होऊ शकते. रिझर्व्ह बँकेने हा निर्णय घेताना अनेक घटकांचा विचार केला आहे, जसे की महागाई नियंत्रणात आहे, अन्नधान्याच्या किंमती स्थिर आहेत, जागतिक तेलदर कमी आहेत आणि देशांतर्गत मागणी वाढविण्याची गरज आहे. पण हा निर्णय एकट्याने पुरेसा नाही. केंद्र सरकारनेही भांडवली खर्च वाढवून, सार्वजनिक गुंतवणूक वाढवून आणि कररचना सुलभ करून या निर्णयाला पूरक उपाययोजना करणे आवश्यक आहे. एकूणच, रेपोदर कपात हा एक महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय आहे. तो अर्थव्यवस्थेला तात्पुरती गती देऊ शकतो, पण त्याच्या प्रभावीतेसाठी इतर समांतर उपाय योजनांची गरज आहे. याचे सकारात्मक परिणाम ग्राहकांसाठी सहज दिसतील. स्वस्त कर्ज, वाढलेली खरेदी, वाढलेली मागणी. पण दीर्घकालीन परिणाम विचारात घेतले, तर गुंतवणुकीवरील परतावा आणि बँकांच्या लाभांशावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जागतिक व्यापारातील घडामोडी, विशेषतः अमेरिका-चीन संघर्ष, हे भारतीय धोरणांवर प्रभाव टाकत राहतील आणि रिझर्व्ह बँकेला त्याप्रमाणे लवचिकपणे धोरण रचना करावी लागेल. या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर, रेपोदर कपात ही केवळ आकड्यांची खेळी नसून ती एक सूचक हालचाल आहे, जी अर्थव्यवस्थेला दिशा देणारी, विश्वास निर्माण करणारी आणि पुढील आर्थिक धोरणांची पूर्वतयारी करणारी ठरते. या निर्णयाला यशस्वी बनवणे हे केवळ रिझर्व्ह बँकेचे काम नाही, तर सरकार, बँका, उद्योग आणि ग्राहक यांचं सामूहिक उत्तरदायित्व आहे. याची जाणीव ठेवून पुढील पावलं उचलण्याची वेळ आली आहे.

# एक धागा सुखाचा, १०० धागे दुःखाचे!

नव्या वित्तीय वर्षास सुरुवात होऊन दोन आठवडेही होत नाहीत, तोच गॅस सिलिंडरपासून बँकिंग सेवापर्यंत तसेच जीवनावश्यक शेकडो औषधांचे दरही वाढले आहेत. एक रेपो रेट ०.२५ टक्क्यांनी कमी होण्याशिवाय काही दिलासादायक घडलेले नाही. रेपो रेट कमी होण्याचा हा एक धागा सुखाचा पकडल्यास सिलिंडर दरवाढ, टोलचे दर महाग, एटीएममधून पैसे काढण्यावर अतिरिक्त सेवा, जीवनावश्यक औषधांचे दर महागणे, ही स्थिती पाहता १ धागा सुखाचा, १०० धागे दुःखाचे, हे गदिमांचे गीत पुन्हा आळवण्याची वेळ सामान्य माणसांवर आली आहे.




गेल्या वर्षी म्हणजेच २०२४ मध्ये लोकसभेसह महाराष्ट्र तसेच अन्य काही महत्त्वाच्या राज्यांच्या विधानसभा निवडणुका असल्याने अशा प्रकारे काही महागाईत वाढ झाली नव्हती. महागाईत वाढ झाली असती, तर निवडणुकांमध्ये त्याचा फटका नक्कीच बसला असता. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी तो धोका पत्करला नाही. याउलट दर कमी कसे होतील, यासाठीच धडपड सुरू होती. उदाहरण घ्यायचे झाल्यास घरगुती गॅस सिलिंडरचे घेता येईल.

घरगुती गॅस सिलिंडरचे दर हे ५० रुपयांनी वाढविण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीप्रणित (एनडीए) केंद्र सरकारने नुकताच सोमवार, ७ एप्रिल रोजी घेतला. सरकारचा हा निर्णय सर्वसामान्यांसाठी मात्र मोठा झटका देणारा आहे. एकाचवेळी सिलिंडरच्या दरात तब्बल ५० रुपयांची दरवाढ करणे हे महागाईचा आणखी विस्फोट करण्यासारखे आहे. सरकारच्या या एका निर्णयामुळे सर्वसामान्यांचे जगणे महाग होऊन बसले आहे.

सरकारच्या निर्णयामुळे याआधी ८०३ रुपयांना मिळणाऱ्या घरगुती गॅस सिलिंडरसाठी ८५३ रुपये मोजावे लागत आहेत. केवळ सर्वसामान्यांच्या घरगुती गॅस सिलिंडरमध्येच नाही, तर उज्ज्वला गॅस सिलिंडरमध्येही ५० रुपयांची वाढ झाली असून ५०३ ऐवजी ५५३ रुपये गोरगरीबांना यासाठी मोजावे लागत आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातील दरवाढीच्या परिणामामुळे भारतात घरगुती गॅस सिलिंडरचे दर ५० रुपयांनी वाढल्याचे कारण केंद्रीय पेट्रोलियममंत्री हरदीपसिंग पुरी यांनी दिले, परंतु या उत्तराने अनेकांचे समाधान झालेले नाही.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील बाजारांमधील अस्थिरतेमुळे केवळ घरगुती गॅस सिलिंडरची दरवाढ का, व्यावसायिक सिलिंडरचे दर स्थिर का, असेही सवाल करण्यात येत आहेत. व्यावसायिक सिलिंडरची दरवाढ यापूर्वीच झाल्यामुळे पेट्रोलियम कंपन्याच याचा अधिक खर्च उचलणार असल्याचे स्पष्टीकरण सरकार दरबारी दिले जात आहे. तसेच पेट्रोलियम कंपन्यांना आवश्यकता भासल्यास व्यावसायिक सिलिंडरच्या दरांमध्येही वाढ होईल, असे प्रशासनाकडून जरी स्पष्ट करण्यात आले असले तरी, हे उत्तर काही पचनी पडत नसल्याचा आक्षेप सर्वसामान्यांचा आहे.

घरगुती असो किंवा व्यावसायिक गॅस सिलिंडरमधील इंधन हे सारखेच असते. फक्त वजनाचा फरक असतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर जर मूळ गॅस इंधनच महागले असेल, तर दोन्ही ठिकाणी दरवाढ झाली असती. केवळ घरगुती गॅस सिलिंडर तब्बल ५० रुपयांनी महागणे आणि व्यावसायिक सिलिंडरच्या दरात कोणतीही दरवाढ नाही, यामागे नक्की काहीतरी गौडबंगाल असल्याचा संशय सर्वसामान्यांना आहे. खरे तर गॅस सिलिंडरची दरवाढ ही आंतरराष्ट्रीय बाजाराच्या स्थितीऐवजी निवडणुका नसल्यामुळे झाली की काय अशी शंकाही येत आहे.

कारण, २०२४ मध्ये निवडणुकांमुळे न होणारी घरगुती गॅस सिलिंडरची दरवाढ ही २०२५ साली झाली. नेमकी हीच वेळ कशी काय साधली जाते. म्हणजे जेव्हा निवडणुका जवळ येतात, तेव्हा लोकांची मते आपल्या बाजूने वळवण्यासाठी सत्तेत असणारे सवलतींचा पाऊस पाडतात. जीवनावश्यक गोष्टींच्या किमती कमी करतात, पण जेव्हा जनतेकडून कुठलाही धोका नसतो, तेव्हा दिलेली सवलत भरपूर व्याजासह भरून काढतात. पण त्यावेळी सरकार स्थिर असल्यामुळे जनता काहीही करू शकत नाही.

यावर्षी राजधानी दिल्लीतील विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर आता थेट नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये बिहारसारख्या महत्त्वपूर्ण राज्याच्या विधानसभा निवडणुका होणार आहेत. याशिवाय मधल्या जवळपास ६ महिन्यांच्या काळात कोणत्याही महत्त्वाच्या राज्यांच्या निवडणुका नाहीत. त्यामुळेच नवे वित्तीय वर्ष सुरू होताच घरगुती गॅस सिलिंडरचे दर तब्बल ५० रुपयांनी वाढविण्याची हिंमत सत्ताधाऱ्यांची झाल्याचे सर्वसामान्यांना वाटत आहे.

कोणत्याही प्रकारच्या निवडणुका तोंडावर असत्या, तर सत्ताधारी यासाठी कधीच धजावले नसते. सहा महिन्यांपर्यंत दरवाढ करायची आणि मग, निवडणुका जवळ आल्या की वाढीव दरांपासून काही सवलत देत दर कमी केल्याचे दाखवायचे आणि आपली राजकीय पोळी भाजून घ्यायची, अशाच प्रकारचे घाणेरडे आणि दुर्दैवी राजकारण आपल्याकडे होत आले आहे.

गेल्या वर्षी २०२४ मध्ये, तर निवडणुकांचे वर्ष असताना सरकारकडून ८ मार्चला महिला दिनाचे औचित्य साधून घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात कपात करण्यात आली होती. केंद्र सरकारने मागील वर्षी म्हणजे ८ मार्च २०२४ रोजी महिला दिनी सिलिंडरच्या किमतीत १०० रुपयांची कपात केली होती. त्यावेळी सिलिंडरची किंमत ९०३ रुपये होती. सरकारच्या निर्णयामुळे त्याचे दर १०० रुपयांनी घटून ८०३ रुपयांवर आले होते.

सरकारचा निर्णय सर्वसामान्यांसाठी दिलासादायक होता. निवडणूक काळात आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर मतदारांना प्रलोभने दाखवणारे निर्णय घेता येत नाहीत, परंतु आंतरराष्ट्रीय बाजारातील परिणामांच्या पार्श्वभूमीवर गॅस सिलिंडरचे दर घटल्याचे त्यावेळी सांगण्यात आले. याबाबतचा निर्णय पेट्रोल कंपन्यांचा असून याचा सरकारशी थेट कोणताही संबंध नसल्याचा दावाही करण्यात आला.

घरगुतीसोबतच काही दिवसांनी व्यावसायिक सिलिंडरच्या दरांमध्येही कपात करण्यात आली होती. १ एप्रिल २०२४ रोजी तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीत ४४.५० रुपयांची कपात केली होती. ऐन निवडणूक काळात घरगुती असो वा व्यावसायिक दोन्ही गॅस सिलिंडरच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर कमी होत असल्याचे आत्तापर्यंत अनेकदा पाहायला मिळाले आहे.

परंतु २०२५ मध्ये केवळ घरगुती गॅस सिलिंडरचीच ५० रुपयांनी दरवाढ झाली आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरची दरवाढ होईल की नाही, हे येणारी वेळच ठरवेल, परंतु निवडणूक काळात सिलिंडरचे दर कमी होतात आणि निवडणुका नसताना ते वाढतात, हेच खरे आहे. आत्तापर्यंत आपल्याकडे असेच होत आले आहे.

सत्ताधारी कोणीही असो, आपला राजकीय स्वार्थ साधून घेण्यासाठी सर्वच राजकारण्यांनी अशीच वृत्ती जोपासली आहे. नव्या वित्तीय वर्षाला सुरुवात झाल्यापासून आपल्याकडे केवळ सिलिंडरचीच दरवाढ झालेली नाही. सिलिंडरसोबतच रेडी रेकनरचे दरही महागल्याने सर्वसामान्यांना आपले घराचे स्वप्न पूर्ण करणेही अवघड होऊन बसले आहे. रेडी रेकनरच्या दरासोबतच पथकरामध्येही वाढ झाल्याने नवीन वाहने घेणेही नव्या वर्षात महागले आहे.

यासोबतच टोलमध्येही भरमसाठ वाढ झाल्याने प्रवासही महागला आहे. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाच्या टोलदरामध्ये तब्बल १९ टक्क्यांची वाढ झाली आहे. समृद्धी महामार्गावर हलक्या वाहनासाठी टोलसाठी आता १ हजार २८७ रुपये द्यावे लागत आहेत. आधी ते १ हजार ८१ रुपये द्यावे लागत होते. व्यावसायिक वाहनांसाठी २०७५ रुपये मोजावे लागत आहेत. आधी या वाहनांसाठी १७४३ रुपये द्यावे लागत होते.

बस आणि ट्रकसाठी आधी ३ हजार ६५६ रुपये द्यावे लागत होते. आता नव्या दरानुसार या वाहनांना समृद्धी महामार्गावरून प्रवास करताना ४ हजार ३५६ रुपये द्यावे लागत आहेत. त्याचबरोबर अवजड वाहनांकडून ५ हजार ७३७ इतका टोल घेतला जात होता. आता नव्या दरानुसार त्यांना ६ हजार ८३१ रुपये द्यावे लागत आहेत, तर अतिअवजड वाहनांना यापूर्वी ६ हजार ९८१ रुपये द्यावे लागत होते, ते आता ८ हजार ३१२ रुपये द्यावे लागत आहेत.

समृद्धी महामार्ग अजून पूर्णपणे खुला झालेला नाही. केवळ नागपूर ते इगतपुरी या ६२५ किलोमीटरसाठी इतका टोल आकारण्यात येत आहे. मुंबईपर्यंत हा महामार्ग सुरू झाल्यानंतर आणखी टोलमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. केवळ समृद्धीच नाही, तर मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरही टोलच्या दरात वाढ झाली आहे.

टोलसोबतच विमान प्रवास आणि शेकडो जीवनावश्यक औषधांचे शुल्कही वधारले आहेत. सर्वसामान्यांसाठी एटीएममधून पैसे काढणेही आता खर्चिक होऊन बसले आहे. गॅस सिलिंडर दरवाढीसोबतच विविध बाबींमध्ये झालेल्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांना चहूबाजूंनी महागाईला तोंड द्यावे लागत आहे. या महागाईने सर्वसामान्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे.

# कोचिंग क्लासचा बाजार, शिक्षणाचा संहार!

**दहावीच्या परीक्षांनंतर पालक आणि विद्यार्थ्यांना वेध लागतात जेईई, सीईटी, नीट सारख्या परीक्षांचे. या परीक्षांची काठिण्यपातळीशी विद्यार्थ्याला समरस करण्यासाठी खासगी क्लासेसला कवटाळले जाते. या क्लासच्या माध्यमातून पालकांचा शिक्षणावरील खर्च हा काही पटींनी वाढतोच; शिवाय विद्यार्थ्यांना सामाजिक आणि मानसिक समस्यांनाही सामोरे जावे लागते. त्यातच आता महाविद्यालयांनी खासगी क्लासेसशी टायअप करण्याचा 'उद्योग' सुरू केला आहे. या रॅटरेसमध्ये विद्यार्था मात्र फरडला जात आहे.**



दहावीचा निकाल लागला की घराघरात एकच विचारचक्र सुरू होतं, पुढे काय? या प्रश्नाचं उत्तर बहुतेक ठिकाणी आधीच ठरलेलं असतं: जेईई, सीईटी किंवा नीट! 'इंजिनिअर होणार', 'डॉक्टरच व्हायला हवं', 'आयआयटी मिळालं पाहिजे', 'सरकारी मेडिकल सीट हवी' या अपेक्षा केवळ संवादापुरता मर्यादित राहत नाही तर विद्यार्थ्याला रॅट रेसमध्ये सहभागी होण्यासाठी यातून भाग पाडलं जातं.

या रेसच्या रणभूमीवर उतरण्यासाठी आज विद्यार्थ्यांना सर्वात आधी लागतो तो म्हणजे कोचिंग क्लास. शाळा आणि महाविद्यालय फक्त प्रमाणपत्र पुरवण्याचं माध्यम उरतात. खरा अभ्यास कोचिंग क्लासमध्येच होतो, असा पद्धतशीर समज पसरवला जातो. याच पार्श्वभूमीवर हेच क्लासेस आता केवळ शिक्षण देणारी संस्था म्हणून राहिलेले नसून, एक प्रभावशाली उद्योग-साखळी बनले आहेत. शिक्षण हे उद्योग झाल्यावर, शिक्षक हे विक्रेते बनतात आणि विद्यार्थी हे ग्राहक.

अशा परिस्थितीत ग्राहकाचं 'यश' हे ज्ञानावर नाही, तर मार्क्सवर मोजलं जातं. पालकांना वाटतं, की त्यांनी कोचिंगसाठी पैसे दिले म्हणजे कर्तव्य पार पडलं. पण मुलाच्या मनात काय सुरू आहे? तो ताण सहन करू शकतो का? त्याला अजून पर्याय हवे आहेत का? हे प्रश्न त्याला आपण कधी विचारले आहेत? याच साखळीची पुढची कडी म्हणजे, आता महाविद्यालयांनीही याच कोचिंग क्लासेसशी टायअप केलेले दिसते. कॉलेज आणि क्लासेस यांच्यातील अशा अभद्र युतीचे आता थेट 'पॅकेज डील' सुरू आहेत.

दुर्दैवाने, आज जेईई आणि नीट या दोन परीक्षा केवळ शैक्षणिक संधींसाठी नव्हे, तर लाखो कुटुंबांच्या आशा-अपेक्षांचं केंद्र बनल्या आहेत. मात्र या स्पर्धा किती खडतर आहेत आणि त्यासाठी होणारा खर्च किती प्रचंड आहे, हे जाणून घेतल्यास शिक्षण ही कौशल्य आणि सेवा नव्हे तर मोठा उद्योग बनत असल्याची बाब पुढे येते. प्रत्येक वर्षी जवळपास १२ ते १३ लाख विद्यार्थी जेईई मेन परीक्षेला बसतात.

त्यापैकी केवळ २० टक्के विद्यार्थी जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र ठरतात. ही पात्रता मिळाली म्हणजे विद्यार्थी यशस्वी झाले असे समजायचे का? कारण शेवटी आयआयटीमध्ये स्थान मिळवणारे केवळ १० टक्केच विद्यार्थी असतात. जेईई ॲडव्हान्स ही भारतातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक आहे. या परीक्षा केवळ बुद्धिमत्ता तपासत नाही, तर पालकांना प्रचंड मानसिक आणि आर्थिक ताकदही लावायला भाग पाडते.

नीट परीक्षेचं चित्र आणखी व्यापक आहे. दरवर्षी २० लाखांहून अधिक विद्यार्थी या परीक्षेला सामोरे जातात. जवळपास ५६ टक्के विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण करतात. पण प्रत्यक्षात फक्त ५.८ टक्के विद्यार्थ्यांनाच वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळतो. भारतात सध्या जवळपास १.१८ लाख वैद्यकीय जागा आहेत. म्हणजे दर हजारांपैकी केवळ ५ ते ६ विद्यार्थ्यांना त्यांचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळते.

या परीक्षांसाठीचा खर्च ही एक वेगळीच चिंता आहे. जेईई आणि नीटसाठी कोचिंग घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून दरवर्षी सरासरी २०,००० ते २५,००० कोटी रुपये थेट कोचिंग फी म्हणून घेतले जातात. याशिवाय होस्टेल, पुस्तकं, खानपान, प्रवास इत्यादी खर्च मिळून अजून १५,००० ते २०,००० कोटी रुपयांचा बोजा पालकांवर येतो. एकूण हा आकडा ३५,००० ते ५०,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचतो. हे केवळ दोन परीक्षा म्हणजे जेईई आणि नीट यांच्याबद्दल आहे.

कॅट, यूपीएससी यासारख्या इतर स्पर्धा परीक्षांचा समावेश केल्यास भारतातील कोचिंग उद्योग दरवर्षी ६०,००० कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकतो. हा आकडा पाहता भारतात शिक्षण क्षेत्र म्हणजे एक मोठा 'उद्योग' बनल्याचं स्पष्ट दिसतं. पण हे उद्योगातील यश नव्हे तर ते एक सामाजिक आणि आर्थिक चिंतनाचं कारण आहे. केवळ ३ टक्के जेईई मेन विद्यार्थी नीट, आयआयटी सारख्या संस्थांमध्ये प्रवेश मिळवतात. शंभरातल्या केवळ पाच विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रवेश मिळतो. मग उरलेल्या लाखो विद्यार्थ्यांचं काय?

एकूणच आज शिक्षण ही केवळ गुणवत्ता आणि ज्ञानावर आधारित गोष्ट राहिलेली नाही. ती एक स्पर्धात्मक गुंतवणूक बनली आहे, जिथे यशासाठी लाखो रुपये खर्च करावे लागतात. ही परिस्थिती समाजात विषमता निर्माण करणारी आहे. जे आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, त्यांना कोचिंग, संसाधनं, वेळ आणि मोकळं वातावरण मिळतं. पण मध्यमवर्गीय किंवा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ही स्पर्धा अधिक जास्त संघर्षमयी बनते.

हा सगळा प्रकार म्हणजे शिक्षणाच्या पवित्र भूमीवर चाललेला उघडउघड गोरखधंदा आहे. आज कोचिंगसाठी मुलं वयाच्या १३-१४ व्या वर्षी घर सोडतात. कोटा, हैदराबाद, पुणे, दिल्ली ही ठिकाणं आता शैक्षणिक तीर्थक्षेत्रं झाली आहेत. पण इथे शिक्षणापेक्षा अधिक दिसतो तो ताण, दबाव आणि स्पर्धेचा घातक चेहरा. एकट्या कोटा शहराचे उदाहरण समजून घेतलं तरी शिक्षण आता किती घातक स्तरावर उभं आहे हे लक्षात येते.

राजस्थानमधील कोटा शहर हे भारतातील स्पर्धात्मक परीक्षांसाठीचं प्रमुख कोचिंग केंद्र बनले आहे. आयआयटी-जेईई, नीट आणि इतर अनेक परीक्षांसाठी देशभरातून विद्यार्थी येथे येतात. या शहरात सुमारे ३०० कोचिंग क्लासेसच्या संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमध्ये २०२१ साली १ लाखाहून अधिक विद्यार्थी दाखल झाले होते, तर २०२३ साली हा आकडा २ लाखांवर पोहोचला. तथापि, २०२४ साली विद्यार्थ्यांची संख्या घटून ८५,००० ते १ लाख इतकी झाली आहे.

कोचिंग वर्गांची फी संस्थेनुसार आणि अभ्यासक्रमाच्या कालावधीनुसार बदलते. साधारणतः, वार्षिक फी लाखो रुपयांपर्यंत जाऊ शकते. या फी व्यतिरिक्त, विद्यार्थ्यांना निवास, भोजन आणि इतर आवश्यक गोष्टींसाठी अतिरिक्त खर्च करावा लागतो. कोटामधील कोचिंग उद्योगाची वार्षिक उलाढाल २०२३ साली ६,५०० ते ७,००० कोटी रुपये इतकी होती. तथापि, २०२४ साली विद्यार्थ्यांची संख्या घटल्यामुळे, ही उलाढाल कमी होऊन ३,५०० कोटी रुपये झाली आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांबद्दल विचार केल्यास २०१५ पासून २०२३ पर्यंत कोटामध्ये एकूण ११३ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या.

२०२३ साली २६ विद्यार्थ्यांनी जीवन संपवले तर २०२४ साली हा आकडा कमी होऊन १७ वर आला आहे. दरवर्षी कोटामध्ये शेकडो आत्महत्या होतात. ही आकड्यांची नोंद फक्त ज्या घटना समोर येतात त्यांची आहे. मौनाने जगणाऱ्या कितीतरी मुलांची हकिकत अजून गुलदस्त्यात आहे. हैदराबाद, दिल्लीतील परिस्थितीही काही वेगळी नाही. यावरून स्पष्ट होतं की, कोचिंग संस्कृती विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक तणाव टाकत आहे. शिक्षणाच्या या व्यावसायिकरणामुळे, विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे.

या सगळ्यात मोठा फसवा व्यवहार कोण करतंय तर 'शिक्षण संस्था'! शाळा आणि महाविद्यालयांनी जेव्हा शिकवण्याचं मूळ कर्तव्य सोडून, कोचिंग क्लासेसच्या कमिशनवर लक्ष केंद्रित केलं, तेव्हा शिक्षणाचं मूळ उद्दिष्टच नष्ट झालं. काही महाविद्यालयं तर कोचिंग क्लासेससोबत मिळून 'एंटरन्स कोर्सेस' चालवतात आणि त्यावर लाखोंची फी आकारतात. मुलं शाळा-कॉलेजला जातात, पण खरा अभ्यास होतो तो क्लासमध्ये.

मग शाळांची गरज तरी काय? हा सगळा खर्च पालकांचे खिसे रिकामे करतो. मध्यमवर्गीय कुटुंब वर्षाला २-३ लाख रुपये मुलाच्या कोचिंगसाठी खर्च करतं. गावाकडून आलेली मुलं शहरात भाड्याने राहतात, स्वयंपाक शिकतात, एकटेपणात दिवस काढतात. घरचा आधार दूर, शाळेचा काही उपयोग नाही आणि क्लासमध्ये फक्त टेस्ट सीरिज, रँक आणि रिव्हिजन. या सगळ्यात माणूसपण हरवून जातं, याचा आपण विचार करतो का?

या शिक्षण व्यवस्थेचं जे विकृत रूप समोर आलंय ते भयावह आहे. एकेकाळी ज्ञानासाठी आग्रही असलेली संस्कृती, आता टक्केवारी, रँक आणि कोचिंग पॅकेज याच्या भोवऱ्यात गुरफटली आहे. मुलांचं बालपण यात हरवतंय, कुतूहल मरतंय आणि सर्जनशीलता गुदमरून जात आहे. कारण शेवटी आयुष्य म्हणजे फक्त एखाद्या रँकमध्ये बसणं नाही, तर स्वतःला शोधणं आहे.

तो शोध धंदेवाईक कोचिंग क्लासमध्ये कसा लागणार? शिक्षण म्हणजे प्रकाशाचा मार्ग असावा, बाजाराचा नव्हे. शेवटी प्रश्न असा निर्माण होतो की आपण शिक्षणाकडे केवळ स्पर्धा म्हणून पाहतोय का? आपल्या देशातील शिक्षण प्रणाली केवळ काही हजार जागांसाठी वर्षानुवर्षं कोट्यवधी लोकांना धावत ठेवणार आहे का? केवळ परीक्षेची आणि कोचिंग इंडस्ट्रीची ही दादागिरी थांबवण्यासाठी आपण शिक्षणाची गुणवत्ता, जागांची संख्या आणि पर्यायी करिअर मार्ग अधिक व्यापक स्वरूपात विकसित करायला हवेत.

महाविद्यालयं आणि कोचिंग क्लासेस यांचं 'अपवित्र' नातं तोडलं गेलं पाहिजे. शिक्षण संस्थांनी आपली भूमिका ठरवली पाहिजे, त्या शिक्षक आहेत की दलाल? आणि पालकांनीही आपली स्वप्नं मुलांवर लादू नयेत, तर त्यांचं ऐकावं, समजून घ्यावं. नाहीतर 'शिक्षण' या शब्दाचा अर्थच हरवून जाईल आणि शिल्लक राहील फक्त कोचिंग, परीक्षा आणि नैराश्यातून केलेला आत्मघात.

# पर्यावरणीय कर्ज

पृथ्वीवरील संसाधने आपण जितक्या वेगाने वापरत आहोत, त्या वेगाने पृथ्वी त्यांचे पुनरुत्पादन करू शकत नाही. म्हणूनच, जेव्हा आपण पृथ्वीच्या संसाधन पुनरुत्पादन क्षमतेपेक्षा जलदगतीने संसाधनांचा वापर करतो, तेव्हा पुढील वर्षातील संसाधनांचे कर्ज घेणे भाग पडते. अशा परिस्थितीत, आपण एखाद्या वर्षात ज्या दिवशी पृथ्वीच्या संसाधनाचे वार्षिक आर्थिक बजेट संपवतो आणि पर्यावरणीय तुटीला सामोरे जातो, त्या दिवसाला आर्थिक दृष्टिकोनातून 'अर्थ ओव्हरशूट डे' (ईओडी) असे म्हटले जाते. पृथ्वी वाचविण्यासाठी एक कृतिशील चळवळ म्हणजेच 'अर्थ ओव्हरशूट डे' ही संकल्पना. 'अर्थ ओव्हरशूट डे'ची तारीख पुढे ढकलणे म्हणजेच हा दिवस वर्षाच्या शेवटाकडे नेण्याचा प्रयत्न आवश्यक आहे. 'न्यू इकॉनॉमिक फाउंडेशन'च्या अँड्रयू सिम याने 'ग्लोबल फूटप्रिंट नेटवर्क'बरोबर ही संकल्पना २००६मध्ये मांडली. परंतु त्याची सुरुवात ७०च्या दशकात झाली होती. त्या वेळी 'अर्थ ओव्हरशूट डे' डिसेंबरमध्ये होता आणि २०२४मध्ये हा दिवस १ ऑगस्टपर्यंत येऊन पोहोचला आहे. ही परिस्थिती अतिशय चिंताजनक आहे. ही संघटना दर वर्षी ५ जून रोजी चालू वर्षातील 'अर्थ ओव्हरशूट डे'ची तारीख जाहीर करते. 'ग्लोबल फूटप्रिंट नेटवर्क' ही पर्यावरणीय संघटना एका वर्षात ग्रहाची जैवक्षमता (नैसर्गिक संसाधनांचा पुरवठा) आणि मानव पर्यावरणीय पाऊलखुणा यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करते. पृथ्वीच्या वार्षिक संसाधन पुनरुत्पादन क्षमतेला पृथ्वीच्या पर्यावरणीय पाऊलखुणांनी भागून त्याला ३६५ या आकड्याने गुणून 'अर्थ ओव्हरशूट डे' ठरतो.

# हनुमान जन्मोत्सव



हा पवित्र सण हनुमानजींच्या वाढदिवसानिमित्त साजरा केला जातो आणि यावेळी हनुमान जयंती 12 एप्रिल रोजी साजरी केली जाईल. या दिवशी हनुमानाची विशेष पूजा केली जाते. हनुमानजींचे भक्त या दिवशी त्यांच्यासाठी उपवास करतात आणि भक्तीभावाने हनुमानजींच्या पूजेमध्ये मग्न राहतात.हनुमानजींना रामाचे परम भक्त, समस्यानिवारक आणि अमर मानले जाते. मान्यतेनुसार, हनुमान जयंतीच्या दिवशी, भगवान हनुमानाला प्रसन्न करण्यासाठी आणि त्यांचे आशीर्वाद मिळविण्यासाठी पूजेसोबत काही विशेष उपाय केले तर व्यक्तीला त्याच्या त्रासांपासून मुक्तता मिळू शकते. तुम्ही जरी दररोज हनुमान चालीसा पठण करणे चांगले मानले जाते, परंतु हनुमान जयंतीच्या दिवशी हनुमान चालीसा पठण केल्याने बजरंगबली प्रसन्न होतात आणि आपल्याला मानसिक शांती देखील मिळते. हनुमानजींना संकटमोचन म्हटले जात असल्याने, हनुमान चालीसाचे पठण केल्याने व्यक्तीच्या जीवनातील सर्व संकटे नष्ट होतात. तुम्हाला जर तुमच्या महत्त्वाच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होत असतील तर हनुमान जयंतीच्या दिवशी काही विशेष उपाय केल्यास तुम्हाला फायदे होतील. हनुमानजींना प्रसन्न करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे रामाचे नाव घेणे आणि खऱ्या मनाने भजन गाणे. जेव्हा आपण खऱ्या भक्तीने सीतारामाचे गुणगान करतो आणि आपली भक्ती खरी असते, तेव्हा हनुमानजी आपोआपच त्यांचे आशीर्वाद देतात. हनुमानजींना गूळ-हरभरा आणि बुंदीचे लाडू खूप आवडतात. हनुमान जयंतीच्या दिवशी मंदिरात जाऊन हनुमानजींना हा प्रसाद अर्पण करा, त्यांना लाल फुले, सिंदूर आणि चोळाचा प्रसाद देखील द्या.यामुळे ते लवकर आनंदी होतात आणि तुमच्या इच्छा पूर्ण करतात. हे आपल्या जीवनात सकारात्मक ऊर्जा देखील आणते. जर तुम्हाला आयुष्यात कोणत्याही प्रकारचे संकट किंवा त्रास येत असेल तर तुम्ही हनुमान जयंतीच्या दिवशी सिंदूर आणि चमेलीच्या तेलाने विशेष उपाय करू शकता. यासाठी तुम्ही हनुमान जयंतीला मंदिरात जाऊन हनुमानजींना सिंदूर आणि चमेलीचे तेल अर्पण करावे. असे मानले जाते की हे हनुमानजींना खूप प्रिय आहे.हनुमान जयंती हा भक्ती आणि श्रद्धेचा दिवस आहे, जिथे भक्त हनुमानजींच्या चरणी लीन होऊन त्यांची पूजा करतात. हनुमानजींना संकटमोचक मानले जाते, त्यामुळे या दिवशी त्यांची पूजा केल्याने जीवनातील सर्व संकटांवर मात करता येते, असे मानले जाते. हनुमान हे रामायणातील एक प्रमुख पात्र आहेत, त्यामुळे हनुमान जयंतीच्या निमित्ताने त्यांचे स्मरण करून त्यांच्याकडून प्रेरणा घेतात. या दिवशी हनुमान चालीसा आणि रामायणातील सुंदरकांड वाचन करणे विशेष मानले जाते.

### स्वरूप

या दिवशी हनुमानाच्या देवळात सूर्योदयाच्या आधीपासून षोडशोपचार पूजेला तसेच कीर्तनाला प्रारंभ करतात. सूर्योदयाला हनुमानाचा जन्म होतो अशी कथा आहे, त्यानुसार कीर्तन संपते आणि सर्वांना प्रसाद वाटला जातो. हनुमान यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील अंजिनेरी येथे झाला असे मानले जाते. या दिवशी उत्तर भारतात विशेष रूपाने व्रत- उपवास यांचे पालन केले जाते. रामायणातील सुंदर कांड याचा पाठ वाचला जातो. हनुमान चालिसा याचा पाठ या दिवशी करणे महत्वाचे मानले जाते.

### जन्मकथा

वानर गणांचा मुख्य केसरी आणि त्याची पत्नी अंजनी यांचा हनुमान हा पुत्र आहे अशी हिंदू धमार्तील प्रचलित धारणा आहे. हनुमान हा श्रीरामांचा निससीम भक्त असल्याच्या कथा वाल्मिकी रामायणात आढळतात. भारतात रामकथा प्रसिद्ध असून हनुमानाची भक्ती ही सुद्धा प्रसिद्ध पावलेली आहे.

### पूजा पद्धती

महाराष्ट्र राज्यात सामान्यपणे शनिवार, तर उर्वरित भारतात शनिवार आणि मंगळवार हे मारुतीच्या पूजेचे वार मानले जातात. या दिवशी मारुतीला शेंदूर, तेल तसेच रुईची फुले आणि पाने अर्पण करण्याची प्रथा आहे. मारुतीला नारळ फोडण्याची रुढीही पूवार्पार चालत आलेली आहे. उत्तर भारतात सुद्धा हनुमानाची उपासना प्रसिद्ध आहे. तुलसीदास विरचित हनुमान चालिसा उत्तर भारतात विशेष लोकप्रिय आहे. समर्थ रामदास स्वामी यांनी महाराष्ट्रात १७ व्या शतकात स्वराज्य स्थापनेसाठी हनुमानाची उपासना महाराष्ट्रात पोहोचविली. त्यासाठी ११ विविध ठिकाणी मारुतीची मंदिरे स्थापन केली आणि बलाच्या उपासनेचे महत्व प्रस्थापित केले. रामदास स्वामी यांनी रचलेले भीमरूपी महारुद्रा हे मारुती स्तोत्र महाराष्ट्रात उपासनेचे मुख्य स्तोत्र मानले जाते.

### मंत्र

१. ओम हं हनुमते नमः !!
2. ओम नमो भगवते हनुमते नमः !!
3. अष्ट सिद्धी नव निधी
के दाता असा वर दीन
जानकी माता..!!




रामभक्त भगवान हनुमान हे चिरंजीवी आहेत आपण जाणतो. त्यांना संकटमोचन असेही म्हणतात कारण हनुमानजी भक्तांच्या हाकेला धावून येतात आणि त्यांना संकटातून तारतात असे बोलले जाते. पवित्र मनाने केलेली हनुमानजींची भक्ती नक्की फलित होते याचा अनुभव अनेकांना आहे. हनुमानजींना सर्वात प्रिय आहेत भगवान श्रीराम त्यामुळे मारुतीच्या भक्ती किंवा उपासनेत रामांचे नाव घेतल्याने ते प्रसन्न होतात आणि भक्तांवर कृपा करतात असे मानले जाते. आज पाहुयात हनुमान जयंतीला करता येणारे काही महत्वाचे उपाय आणि पूजापाठ ज्यामुळे हनुमान प्रसन्न होऊन तुमच्या मनोकामना पूर्ण करतील.

## हनुमानजींना प्रसन्न करण्याचे उपाय व पूजापाठ

### 'रामनाम' जपणे

हनुमानजी रामभक्त आहेत हे आपल्याला माहितीये. त्यांना सर्वात प्रिय काय असेल तर ते भगवान राम. हनुमानजींच्या फोटो आपण पाहतो त्यांच्या ह्दयात राम वसलेले आहेत. त्यामुळे मारुतीला प्रसन्न करण्यासाठी सर्वात प्रभावी आणि शक्तिशाली उपाय कोणता असेल तर तो रामनाम जपण्याचा. तुमच्या मुखातून रामनाम एकदा जरी आले तरी हनुमानजी आनंदी होतात. आता मनोकामना पूर्ण करण्यासाठी तुम्हाला हनुमान जयंतीच्या दिवशी राम नाम या मंत्राचा ११ वेळा किंवा संकल्प घेऊन १ लाख रामनाम जप करावा. ज्या भक्तांना हे जमणार नाही त्यांनी किमान १०८ वेळा तरी मनोभावे राम नाम यादिवशी जपावे. हनुमानजी कृपा करतील. तसेच रामनाम जप तुम्ही लिहू देखील शकता. एका वहीत लाल पेनाने स्वच्छ अक्षरात राम नाम जप लिहिल्याने सुद्धा मारुती प्रसन्न होतात.

### हनुमान चालीसा पठण

हनुमानचालीसे अपार शक्ती आहे. हनुमान चालीसेची प्रत्येक पंक्ती प्रभावी आणि महत्वपूर्ण आहे. जो व्यक्ती नियमित हनुमानचलीसा वाचतो त्याच्या पाठीशी बजरंगबली सदैव उभे राहतात असे मानले जाते. हनुमान जयंतीच्या दिवशी अनेकजण आपली तीव्र मनोकामना पूर्ण करण्यासाठी सकाळी लवकर उठून १०० हनुमानचालीसा पठण करण्याचा संकल्प घेतात. अखंड ज्योत लावून यादिवशी पठण केलेली हनुमानचलीसा बजरंगबली स्वीकारतात आणि कृपा करतात. किमान १,५,७,११ अशा क्रमाने तुम्ही जमेल तितक्यावेळा हनुमानचालीसा यादिवशी वाचू शकता.

### सुंदरकांड पठण


हनुमानजींना भगवान श्रीराम प्रिय असल्याने त्यांना समर्पित असणारा सुंदरकांडचा पाठ यादिवशी अनेक भक्त करतात. हनुमान मंदिरांमध्ये देखील यादिवशी सुंदरकांड पाठचे आयोजन केले जाते. भक्त मंत्रमुग्ध होऊन सुंदरकांड पाठ ऐकतात आणि म्हणतात सुद्धा. ज्यावेळी सुंदरकांड पाठ केला जातो त्यावेळी हनुमानजी साक्षात तो पाठ ऐकण्यासाठी विराजमान होतात त्यामुळे सुंदरकांडचा पाठ करताना हनुमानजींसाठी एक आसन लावले जाते. हा पाठ अत्यंत प्रभावी असल्याने तुम्ही हनुमानजयंतीला सुंदरकांड मारुतीला अवश्य ऐकवावे.

### रुईच्या पानांची माळ

हनुमानजींच्या आईला म्हणजेच माता अंजनामाई यांना रुईचे झाड प्रिय होते. रुईच्या झाडाच्या त्या भक्त असल्याने त्यांनी आपल्या पुत्राला म्हणजेच हनुमानजींना बळ बुद्धी मिळण्यासाठी रुईच्या झाडाच्या पानांची माळ घातल्याची पौराणिक आख्यायिका आहे. त्यामुळे हनुमानजींना रुईच्या पानांची माळ घालतात. हनुमान जयंतीच्या दिवशी आपल्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी रुईच्या पानांवर चंदन किंवा अष्टगंधाने राम नाम लिहून, आपली मनोकामना सांगून ती माळ मारुतीच्या गळ्यात घालावी याने इच्छापूर्ती होते असे मानतात.

### प्रसाद

मारुतींना चणे, गुळ आणि लाडू हे प्रसादात दाखवले जातात. हनुमानजींना शक्ती, ताकद यांचे प्रतीक मानल्याने त्यांना प्रामुख्याने बळ मिळण्याच्या गोष्टी म्हणजेच चणे आणि गुळाचा नैवेद्य दाखवतात. हा नैवेद्य हनुमानजी आनंदाने स्वीकारतात असे मानले जाते. तसेच त्यांना बेसन किंवा बुंदीच्या लाडवांचा नैवेद्य देखील दाखवला जातो. बुंदीचे लाडू त्यांना विशेष प्रिय आहेत. तसेच विड्याचे गोड पान देखील मारुतीला मनोकामना पूर्तीसाठी चढवले जाते. त्यामुळे हनुमानजयंतीच्या दिवशी त्यांना हे सर्व नैवेद्य अवश्य दाखवा.





# पुणे, कल्याणपाठोपाठ रायगडमध्ये बाळंतिणीचा मृत्यू
# कुटुंबियांचे रुग्णालयावर गंभीर आरोप

**■ठाणे :** पुणे शहरातील प्रसिद्ध दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचा हलगर्जीपणामुळे एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणामुळे सध्या राजकारण तापले आहे. त्यापाठोपाठ कल्याणमध्येही प्रसूतीगृहात उपचारादरम्यान गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबियांनी केला होता. ही दोन प्रकरणं ताजी असतानाचा आता रायगडमध्येही अशाच एक धक्कादायक प्रकार घडल्याचे समोर आले आहे. रायगड जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेच्या ढिसाळ कारभाराचा आणखी एक बळी गेला आहे. श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात एका बाळंतिणीचा हृदयविकाराच्या रुग्णवाहिकेअभावी (कार्डियाक रुग्णवाहिका) मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून आरोग्य यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

**झाकीर वाळवटकर यांचे आरोप**

मृत महिलेचे पती झाकीर वाळवटकर यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ''सिझेरियननंतर माज्या पत्नीची तब्येत अचानक बिघडली. तिला त्वरित अलिबागच्या शासकीय रुग्णालयात आयसीयूमध्ये दाखल करणे गरजेचे होते. पण कार्डियाक रुग्णवाहिका खराब असल्याने दुसरी रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आली. पण जर वेळेत कार्डियाक रुग्णवाहिका मिळाली असती, तर कदाचित माझी पत्नी वाचली असती.'' असा आरोप झाकीर वाळवटकर यांनी केला.




**नेमकं प्रकरण काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, वाळवटी येथील एका महिलेला श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर अचानक त्रास जाणवू लागला. डॉक्टरांनी तिला तातडीने अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात (कउव) हलवण्याचा निर्णय घेतला. मात्र, श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयातील कार्डियाक रुग्णवाहिका बंद असल्याने प्रशासनाने तिला साध्या रुग्णवाहिकेतून अलिबागला पाठवले. अलिबाग येथे पोहोचल्यानंतर महिलेची प्राणज्योत मालवली.

**रुग्णालयाची प्रतिक्रिया काय?**

या घटनेवर श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयातील मठ-फ्लट) डॉ. मधुकर ढवळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ''रुग्णालयात महिलेवर व्यवस्थित उपचार करण्यात आले. अचानक तिची तब्येत खालावली. यामुळे तिला अलिबाग येथे हलवण्याचा निर्णय घेतला. कार्डियाक रुग्णवाहिका नादुरुस्त असल्याने दुसरी रुग्णवाहिका तातडीने मागवण्यात आली. साध्या रुग्णवाहिकेत ऑक्सिजन आणि डॉक्टरही देण्यात आले होते. मात्र, अलिबागला पोहोचल्यावर तिची तब्येत आणखी बिघडली. तिचा मृत्यू झाला. आमच्याकडून कोणताही हलगर्जीपणा झालेला नाही.'' असे डॉ. मधुकर ढवळे म्हणाल्या.

# ९ वर्षांच्या चिमुकलीवर चाकू आणि लाटणीने हल्ला
# बांग्लादेशी आरोपी महिलेला पोलिसांनी केली अटक

**■उल्हासनगर :** एकीकडे महिला सक्षमीकरणाच्या घोषणा होत असताना, दुसरीकडे एका महिलेनेच आपल्या नऊ वर्षांच्या मुलीवर अत्याचार करत अमानुषतेची सीमा गाठली आहे. उल्हासनगरमध्ये घडलेल्या या धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरला असून, आरोपी महिलेविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

नऊ वर्षांच्या चिमुकलीवर अत्यंत क्रूरपणे चाकू व लाटणीने हल्ला करणाऱ्या एका महिलेविरोधात उल्हासनगर पोलिसांनी कठोर कारवाई करत तिला अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे आरोपी महिला बांग्लादेशची रहिवासी असून ती उल्हासनगरमध्ये बोकायदेशीरपणे वास्तव्यास होती. अमिना सुलतान ऊर्फ पूजा (वय ३५) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचं नाव आहे. तिच्या राहत्या घरी तिने आपल्या नऊ वर्षांच्या मुलीवर प्रचंड संतापात हल्ला चढवला. चिमुकलीच्या चेहऱ्यावर आणि पायावर चाकूने वार करण्यात आले, तसेच घरगुती लाटणीचा वापर करून तिला बेदम मारहाण करण्यात आली.

घरातून मुलीच्या ओरडण्याचा आवाज शेजाऱ्यांना ऐकू आल्यावर त्यांनी तात्काळ पोलिसांना घटनेची माहिती दिली.



# गोंदिया झेडपीत प्रशिक्षण घोटाळा?
## प्रशिक्षण दाखवून तब्बल ८५ लाख उचलल्याचा आरोप





**■गोंदिया :** शाळेतील विद्यार्थिनी आणि महिला शिक्षकांना कागदावर प्रशिक्षण दाखवून तब्बल ८५ लाख उचलल्याचा आरोप करण्यात आलाय. संबधीत एनजीओ आणि जिल्हा परिषद अधिका-यांनी संगनमतानं पैसे उचलल्याचा आरोप करण्यात आलाय. आता याप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणी होतेय.

महिलांनी सक्षम व्हावं आणि त्यांना स्वतःची सुरक्षा स्वतः करता यावी यासाठी महिला बाल विकास विभागाच्या वतीनं प्रशिक्षण कार्यक्रम आखण्यात आला. अनुसुचित जातींच्या विद्यार्थिनी आणि महिलांना जुडो आणि कराटेचं प्रशिक्षण देण्यासाठी एका एनजीओची नियुक्ती करण्यात आली. संबधीत एनजीओला प्रत्येक शाळेत जाऊन महिला शिक्षिका आणि विद्यार्थिनींना १२० तास प्रशिक्षण देण्याचं बंधन होतं.. मात्र प्रत्यक्षात संबंधीत एनजीओनं प्रशिक्षण कागदावर दाखवलं. आणि संबंधीत एनजीओ आणि जिल्हा परिषदेतील अधिका-यांनी संगनमत करून तब्बल 85 लाख रुपये उचलल्याचा आरोप करण्यात आला.

गोंदिया जिल्ह्यातील हा धक्कादायक प्रकार आहे. कोणत्याही जिल्हा परिषद शाळेत प्रशिक्षण मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आलं नाही. मात्र प्रत्येक विद्यार्थीमागे मिळणारे पैसे उचलल्याचा आरोप करण्यात आला आहे. शाळेतील मुख्याध्यापकांनीही मुलींना प्रशिक्षण दिलं नसल्यांच्या आरोपांना दुजोरा दिला आहे.

विद्यार्थिनींना प्रशिक्षण देण्यासाठीच्या कार्यक्रमासाठीचं टेंडर २०२२-२३ ला काढण्यात आलं आहे. प्रशिक्षण कालावधी २८ मार्च २०२४ पर्यंत होता. आता या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तीन एनजीओंना विद्यार्थिंना प्रशिक्षण देण्याचं काम देण्यात आलं होतं. मात्र प्रशिक्षण न देता संगमनत करून तब्बल 85 लाख रुपये लाटण्यात आले. त्यामुळे आता या प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करण्याची गरज आहे.

# अमरावतीत भररस्त्यात वाहतूक अडवून डान्स करणं रील स्टार्सना पडलं महागात





**■ठाणे :** सध्या रीलचा जमाना असून, प्रसिद्ध होण्यासाठी हे रीलस्टार कोणत्याही थराला जातात. अनेकदा रीलसाठी जीव धोक्यात घातला जातो, तर कधी कायदाही मोडला जातो. अमरावतीमधील असाच एक प्रकार समोर आला आहे. रस्त्याच्या मधोमध उभे राहून एक महिला आणि पुरुषाने गाण्यांवर डान्स करत रील शूट केला आणि वाहतुकीला अडथळा निर्माण केला होता. यानंतर रस्त्यावर धिंगाणा घालणाऱ्या या रीलस्टार जोडप्यावर कारवाई करण्याच्या मागणीने जोर धरला होता. पोलिसांनीही त्याची दखल घेतली आहे.

भर रस्त्यात वाहतुकीला अडथळा निर्माण करून व्हिडिओ शूट केल्या प्रकरणी अखेर रिलस्टार देविदास इंगोले याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तर दुसरीकडे महिला रीलस्टारचा शोध सुरू आहे. अमरावतीच्या पंचवटी चौकात वाहतुकीला अडथळा निर्माण करून या रीलस्टार जोडप्याने व्हिडिओ शूट केला होता. त्यानंतर नेटकऱ्यांनी या रीलस्टार जोडप्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. पोलिसांनी कारवाई केली असून वाहतुकीला अडथळा निर्माण होईल असं कोणतंही कृत्य करू नये असं आवाहन केलं आहे.

**महिलेने मागितली माफी**

महिला रीलस्टार सध्या पुण्यात असल्याची माहिती आहे. या महिलेने व्हिडीओ शेअर केला असून, कडून माफी मागिती आहे. झालेला प्रकार चुकीचा असून त्याबद्दल मी माफी मागते असं तिने म्हटलं आहे.

रश्मी राणी राठोड आहे. मी महाराष्ट्राची लावणीसम्राज्ञी आहे. मी लोककलावंत, लोकउपासक आहे. मी भारतभर प्रवास करत कार्यक्रम करत असते. माझा सिग्नलवरील एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. तो प्रकार चुकीचा आहे, त्याबद्दल मी सर्वांची माफी मागते. देविदास दादा यांनी मला माज्यासोबत व्हिडीओ केलात, तर माझे व्ह्यू वाढतील असं म्हटलं होतं. त्यानंतर आम्ही व्हिडीओ शूट केला. मला वाटलं की, त्यांनी परवानगी घेतली असेल. त्यांचे सिग्नलवरचे व्हिडीओ असतात. त्यामुळे मी धाडस केलं. मला करायचंच नव्हतं, पण होऊन देला. हा चुकीचा प्रकार असल्याने माफी मागते. यापुढे मी असं काही करणार नाही. मला माफ करावं. लोक कलावंत म्हणून आम्ही कार्यक्रम करतो तेव्हा आमच्या कलेची दखल घेत नाही. पण चुकीच्या पद्धतीने या गोष्टी व्हायरल होत असतात. मी साध्या मनाने गेली होती, पण चुकीचं झालं. यानंतर असं काही घडणार नाही मला माफ करा,₹ असं त्यांनी म्हटलं आहे.

सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांनी वाहतुकीला अडथळा होईल असं कृत्य कोणीही करू नये अन्यथा कायदेशीर कारवाई होणार असा इशारा दिला आहे.

# समाजमाध्यमाच्या ओळखीतून तरूणीवर अत्याचार... आरोपी अटकेत, चित्रफीतही केली प्रसारीत

**■उल्हासनगर :** फेसबुकवरून झालेल्या ओळखीचे पुढे प्रेमात रूपांत झाले आणि त्यातूनच तरूणीवर अत्याचार करून त्याची चित्रफीत तयार केल्याचा धक्कादायक प्रकार उल्हासनगरात समोर आला आहे. आरोपीने हीच चित्रफित दाखवत त्या तरूणीवर सातत्याने अत्याचार केले. पिडीतेने विरोध करताच आरोपीने एक चित्रफीत समाज माध्यमावर प्रसारीत केली. याचा तरूणीला धक्का बसला. मात्र तिने पुढे येत पोलिसात धाव घेतल्याने आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

समाज माध्यमातून झालेल्या ओळखीतून अनेकांची फसवणूक झाल्याचे प्रकार गेल्या काही वर्षात समोर आले आहे. उल्हासनगरात अशाच एका प्रकरणात प्रेमाच्या नावाने फसवणूक करत तरूणीवर अत्याचार करण्यात आले. पिडीत तरूणी आणि आरोपीची ओळख समाज माध्यमावर झाली होती. ओळखीचे रूपांतर मैत्रित आणि पुढे प्रेमात झाले. प्रेमातून तरूणीला आरोपीने शरिरसंबंधांसाठी एका हॉटेलवर नेले. मात्र आरोपी इतक्यावरच थांबला नाही तर त्याने लपून या सर्व प्रकाराचे चित्रण करत चित्रफिती तयार केल्या. त्या चित्रिकरणावरून तरूणीला धमकी देत त्याने तरूणीला शारिरीक संबंध ठेवण्यासाठी दबावही टाकला.

आरोपीने या घटनेचेही गुप्तपणे चित्रीकरण करून, पुन्हा पुन्हा धमकी देत तिच्यावर शारीरिक संबंध ठेवण्याचा दबाव टाकला. पीडितेने याला विरोध केला. त्यामुळे आरोपीने एक चित्रफीत समाज माध्यमांवर प्रसारीत केली. तसेच उर्वरित चित्रफितही प्रसारीत करण्याची धमकी आरोपीने दिली. या संपूर्ण प्रकारामुळे पीडित तरुणीला मानसिक धक्का बसला होता. मात्र तिने हिमतीने तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेतला. तरूणीने उल्हासनगर पोलीस ठाण्यात तक्रारीसाठी धाव घेतली. तरूणीच्या तक्रारीच्या आधारावर पोलीस निरीक्षक (गुन्हे) चंद्रहार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने जलद हालचाल करत आरोपी पंकज राममनोहर शुक्ला (२५) याला अटक केली. तो बदलापूरमधील शिवाजी चौक येथे वास्तव्यास होता. हा आरोपी मूळचा उत्तर प्रदेशमधील गोंडा जिल्ह्यातील इटिया ठोक गावचा आहे, अशी माहिती उल्हासनगर पोलिसांनी दिली आहे.

अटक करण्यात आल्यानंतर आरोपीला न्यायालयात सादर करण्यात आले होते. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा सखोल तपास उल्हासनगर पोलिसांकडून सुरू आहे. आरोपीकडून आणखी काही धक्कादायक बाबी उघड होण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर उल्हासनगर शहरात संताप व्यक्त होतो आहे. समाज माध्यमातून मैत्री करताना काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांकडून सातत्याने केले जाते. मात्र त्यानंतरही असे प्रकार होत असल्याचे दिसून आले आहे.

# मुलीवर लैंगिक अत्याचार, तरुणाला २० वर्ष सक्त मजुरी



**■ठाणे :** कळवा येथे एका १३ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या महेश कांबळे याला विशेष पोस्को न्यायालयाने २० वर्ष सक्त मजुरी आणि २० हजार रुपये दंडाची तसेच दंडाची रक्कम न भरल्यास सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

कळवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ऑगस्ट २०२१ मध्ये १३ वर्षीय मुलीवर महेश कांबळे याने लैंगिक अत्याचार केले होते. याप्रकरणी त्याच्याविरोधात कळवा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेचे कलम ३७६ सह पोस्को ४,८,१२ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याच्या तपासात तात्कालीक पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षक सुरेश आजगावकर आणि त्यांच्या पथकाने भक्कम पुरावे गोळा करून महेश कांबळे याच्या विरोधात ठाणे न्यायालयामध्ये भक्कम पुरावे सादर केले होते.

या गुन्ह्याच्या संदर्भात सरकारच्या वतीने सरकारी अभियोक्त्या म्हणून रेखा हिरवाळे यांनी काम पाहिले. तर तत्कालीन पोलीस निरीक्षक सुरेश आजगावकर, कळवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक उत्तेकर, साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आर.एस. ठाकूर, पोलीस हवालदार पाटणकर, वऱ्हाडे, शिंदे यांनी तपासा दरम्यान न्यायालयात ठोस पुरावे सादर केले.

**पोस्को न्यायालयाचा निर्णय :** या गुन्ह्याची सुनावणी विशेष पोस्को न्यायालयाचे न्यायाधीश डी.एस. देशमुख यांच्या समोर झाली. न्यायालयाने महेश कांबळे यास भारतीय दंड संहितेचे कलम ३७६, ५०६ (२) सह पोस्को ३,४,६,८,११,१२ प्रमाणे दोषी ठरवुन २० वर्ष सक्त मजूरी व २० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली. तसेच दंडाची रक्कम भरली नाही तर सहा महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावण्यात आली.

# बीडमध्ये ४० दिवसांपूर्वी लग्न झालेल्या विवाहितेची आत्महत्या... एकाच वेळी निघाली दोघांची अंत्ययात्रा

**■बीड :** लग्न, नवीन संसार सुरु झाला की, एकमेकांना आणाभाका देणं आलंच. प्रत्येक व्यक्तीच्या आपल्या जोडीदाराकडून असलेल्या अपेक्षा थोड्या फार फरकाने कमी जास्त असतात. अशाच अपेक्षांच्या ओझाखाली ४० दिवसांपूर्वी सुरु झालेला संसार कोलमडून गेला आहे.

बीड जिल्ह्यातील केतुरा येथे किरकोळ वादावरुन नवविवाहित दाम्पत्याने आत्महत्या केली आहे. २१ वर्षीय शुभांगी गालफाडे आणि २७ वर्षीय अक्षय गालफाडे अशी आत्महत्या केलेल्या जोडप्यांची नावे आहेत. नवदाम्पत्याच्या कुटुंबियांना मोठा धक्का बसला असून गुरुवारी दोघांवर एकाचवेळी अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.

बीडच्या केतुरा येथील २७ वर्षीय अक्षय गालफाडेचा जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात २१ वर्षीय शुभांगीसोबत लग्न झालं. ४० दिवसांपूर्वी लग्न झालेल्या अक्षयची सुट्टी संपली आणि तो पुण्याला निघाला. लाईट फिटिंग काम करणारा अक्षय सुट्टी संपवून २ एप्रिल रोजी पुन्हा निघाला.




नवविवाहित पत्नी शुभांगी अक्षयकडे मलाही पुण्याला सोबत ने असा हट्ट करु लागली. मी आधी पुण्यात जातो भाड्याने घर घेतो मग तू ये, अशा शब्दात अक्षय शुभांगीची समजूत घालत होता. पण शुभांगी ऐकायला तयार नव्हती. 'मला सोबत ने नाहीतर जीव देईन', अशी धमकी देत शुभांगीने टोकाचं पाऊल उचललं.

अक्षय पुण्याला जायला बसमधून निघाला. तो नवगण राजुरीजवळ पोहोचला असेल आणि शुभांगीने त्याला व्हिडीओ कॉल केला. व्हिडीओ कॉल करुन शुभांगीने गळफास लावून घेतला. हा सगळा प्रकार बघून अक्षय तातडीने माघारी फिरला. घरी येताच होत्याचं नव्हतं झालं होतं. शुभांगीचा मृतदेह शवविच्छेदन जिल्हा रुग्णालयात नेण्यात आला होता.

यावेळी शुभांगीच्या कुटुंबियांनी आक्रमक पवित्रा घेतला. ४० दिवसांपूर्वी लग्न अन् पत्नीची आत्महत्या आणि कुटुंबातील वाद या सगळ्याने निराश झालेल्या अक्षयने शेतात जाऊन गळफास लावून जीव दिला. गुरुवारी दुपारी अक्षय आणि शुभांगी यांच्या पार्थिवावर केतुरा गावंत अंत्यविधी करण्यात आले.

# उल्हासनगरात बॉलच्या किमतीवरून राडा



**■उल्हासनगर :** उल्हासनगरच्या रस्त्यावर पुन्हा एकदा तणावाचे ढग दाटले आहे. कॅम्प नंबर ३ मध्ये ग्राहक आणि दुकानदारामधील किरकोळ वाद क्षणार्धात तुफानी हाणामारीत परिवर्तित झाला. वस्तूच्या किमतीवरून सुरू झालेला वाद इतका चिघळला की त्याचे पडसाद थेट पोलीस ठाण्यापर्यंत गेले. सोमवारी दुपारी ही थरारक घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, आता याचे पडसाद संपूर्ण शहरात उमटत आहेत.

उल्हासनगरमधील कॅम्प क्रमांक तीनमधील एका जनरल स्टोअरमध्ये ग्राहक आणि दुकानदारामध्ये झालेल्या वादातून मोठ्या हाणामारीचा प्रकार समोर आला आहे. अनिल तोतानी यांच्या जनरल स्टोअरमध्ये सोमवारी दुपारी रोहित भगवाने हा आपल्या पत्नी आणि मुलासह खरेदीसाठी आला होता. यावेळी त्यांनी खेळण्याचा एक बॉल विकत घेतला, मात्र त्या बॉलच्या किमतीवरून रोहित आणि दुकानदार अनिल यांच्यामध्ये वाद सुरू झाला.

सुरुवातीला तोंडाने सुरू झालेला हा वाद काही क्षणांतच विकोपाला गेला आणि दोघांमध्ये जोरदार हाणामारी झाली. याच दरम्यान, दुकानदार अनिल तोतानी मोबाइलमध्ये संपूर्ण घटना चित्रीत करत होता, अशी माहिती समोर आली आहे. मात्र, याच गोष्टीवर आक्षेप घेत ग्राहक रोहितने मोबाइल हिसकावून तो फोडून टाकला.

या झटापटीत रोहित भगवाने आणि त्याच्या पत्नीवर लाकडी दांडक्याने मारहाण झाल्याचे सांगण्यात येत आहे. तर दुसरीकडे, दुकानदार अनिललाही मारहाण झाल्याचा दावा करण्यात आला आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्याचे फुटेज सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

दरम्यान, या प्रकरणी उल्हासनगरच्या मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

# सोलापुरात जन्मदात्या आईचा मृतदेह समोरुन गेला पण आठपैकी एकही मुलगी पुढेही नाही आली

**■सोलापुर :** आई बाळाला ९ महिने आपल्या पोटात वाढवते, लहानाचं मोठं करते, चांगले संस्कार करते पण हीच मुलं मोठी झाल्यावर आईला वाईट वागणूक देत असतील तर त्यापेक्षा दुर्दैवी असं काही नाही. जन्मदात्या आईचा मृतदेह समोरून गेला मात्र अंत्यसंस्कारासाठी ८ मुली अन् सख्खा भाऊ पुढे आला नाही.

सोलापुरातील मोहोळ तालुक्यात हा संतापजनक प्रकार समोर आला. जन्मादाती आई आणि मुलींच्या नात्यातील मायेचा ओलावा आटल्याचे या घटनेत साऱ्यांना पाहायला मिळाले. भिमाबाई नागनाथ चटके असे या मृत दुर्दैवी आईचे नाव असून त्या 75 वर्षांच्या होत्या. मुलींनी आईच्या मृतदेहाकडे पाठ का फिरवली? आईचे अंत्यसंस्कार करु नये, असे त्यांना का वाटले? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.



**कोणीही घेतला नाही पुढाकार**

मात्र २ एप्रिल रोजी त्यांचा वृद्धापकाळाने मृत्यू झाला. यावेळी भिमाबाईच्या 8 मुली अन् सख्खा भाऊ आश्रमात आले. मात्र एकानेही अंत्यसंस्कारासाठी पुढाकार घेतला नाही उलट ८ पैकी ५ मुलींनी आणि भावाने तेथून काढता पाय घेतला. तर उर्वरित ३ मुलींनी अंत्यसंस्काराचे काय ते तुम्हीच बघा असे म्हणत घरची वाट पकडली धक्कादायक बाब म्हणजे वडिलांच्या निधनानंतर आईच्या वाट्याची ८ एकर जमीन सर्व बहिणींनी वाटून घेतली मात्र आईचा सांभाळ एकीनेही केला नाही. प्रार्थना फाउंडेशनचे संचालक प्रसाद मोहिते यांनी यासंदर्भात माहिती दिली. या घटनेमुळे जन्मादाती आई आणि मुलींच्या नात्यातील ओलावा आटल्याने पाहायला मिळाले. प्रार्थना फाउंडेशनचे प्रसाद मोहिते यांनी आपल्या सहकाऱ्यां सोबत भीमाबाई चटके यांच्यावर अंत्यसंस्कार केले. या घटनेमुळे सोलापुरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या दुर्दैवी घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झालाय.

मृत्यूमुखी पावलेल्या आईच्या वाट्याला 8 एकर जमिन आली. आईला ऐकता येत नव्हते तसेच ती दृष्टीबाधितही झाली होती. अशा स्थितीत आईची काळजी घ्यायची सोडून मुलींनी तिले एका मंदिरात सोडून दिले होते. याहून संतापजनक म्हणजे मुलींनी आईच्या वाट्याला असलेली ८ एकर इस्टेट वाटून घेतली होती.

**कोणी संभाळलं?**

अशा परिस्थितीत दुर्दैवी आईला कोणी संभाळलं, कोणी तिच्यावर अंत्यसंस्कार केले? असे प्रश्न उपस्थित होतात. मोहोळ तालुक्यातील मोरवंची येथील प्रार्थना फाउंडेशनच्या प्रसाद मोहिते आणि अनु मोहिते या दाम्पत्याने आपल्या अनाथ आश्रमात या आज्जीना सांभाळले. भिमाबाई या मोहिते दाम्पत्याच्या अनाथ आश्रमात राहत होत्या.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com